Literacy for a Billion

Movie: Yedyanchi Jatra
Year: 2012

Song: Nem kaaljacha dharalaa
Lyricist: Guru Thakur

हं...
हो...
नेम काळजाचा धरला गं
त्यानं धरला
हां नेम काळजाचा धरला गं
त्यानं धरला
तीर नजरेचा
सुटला गं बाई सुटला
पाव्हणं मिशीत मधाळ हसला
गडी रंगीला हा कोण कुठला
ज्याच्या ओढीनं हा जीव
झालाय येडापिसा
काटा रूतला गं बाई रूतला
काटा इश्काचा जिव्हारी रूतला
काटा रूतला गं बाई रूतला
काटा इश्काचा जिव्हारी रूतला

हो...
राहीना चित्त थाऱ्यावर राहीना
राहीना
राहीना कळ उरावरी राहीना
हो... ओठावरी लाली आली
लाज माझ्या गाली
रंग माझा गोरा गोरा
त्याला भुलले मी अशी
मदनाला रती जशी
लई भारी त्याचा तोरा
उभ्या गावाच्या आलं हे ध्यानी
त्याला सांगावा धाडा हो कुणी
ज्याच्या ओढीनं हा जीव
झालाय येडापिसा
काटा रूतला गं बाई रूतला
काटा इश्काचा जिव्हारी रूतला
काटा रूतला गं बाई रूतला
काटा इश्काचा जिव्हारी रूतला

ये... हां...ये...
ये... हां...
कशी त्याच्यापायी आज
नाव गाव काही आठवेना
माझं मला
हरवला सूर ताल
बहकली चाल का कळेना
माझं मला
डोळा रातीला लागंना बाई
अर्ध्या रातीला चाहूल येई
ज्याच्या ओढीनं हा जीव
झालाय येडापिसा
काटा रूतला गं बाई रूतला
काटा इश्काचा जिव्हारी रूतला

काटा रूतला गं बाई रूतला
काटा इश्काचा जिव्हारी रूतला
काटा

काटा
हे काटा
काटा...

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*